# जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमातंर्गत
# करारतत्वावर अधिकारी व कर्मचारी नेमणेकरीता जाहिरात

## थेट मुलाखत (Walk-In-Interview)

जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, परभणी येथील करारतत्वावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे पद भरणे आहे.

| पदाचे नाव | पदे | मुख्यालय | किमान शैक्षणिक पात्रता | अनुभव | मानधन (प्रति माहे) |
|---|---|---|---|---|---|
| मनोविकार तज्ञ | १ | जिल्हा रुग्णालय परभणी | M.B.B.S.DPM | डि.एम.एच.पी.कार्यक्रमांतर्गत शासकिय मनोविकार विभागामध्ये कामकाज केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | ७०,०००/- |

**अर्जाचा नमुना :-** अर्जदाराने अर्जावर १. स्व:ताचे संपुर्ण नाव २.वडिल किंवा पतीचे नाव ३. पासपोर्ट साईज रंगीत ४ फोटो ४.राष्ट्रीयत्व ५. जन्मतारीख ६.कायमचा पत्ता व मोबाईल क्रमांक ७. शैक्षणिक अहर्ता ८.अनुभव ९.इतर प्रमाणपत्रे यांची छायाप्रती साक्षांकित करुन लावावी.

**निवडिची अटी शर्ती व अहर्ता :-**

१. अर्ज स्वीकारणी व नोंदणीचा कालावधी हा सकाळी १०.०० ते १२.०० असा राहील.

२. उपरोक्त प्रमाणे पात्र उमेदवारांनी Walk-in Interview साठी दिनांक २४/११/२०१७ वार शुक्रवार रोजी दुपारी ठिक १.००.वाजता रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र, परभणी शास्त्रीनगर कॉर्नर जेल रोड परभणी (जिल्हा रुग्णालय परभणी च्या मागे) येथे शैक्षणिक अहर्तेच्या मुळ कागदपत्रे व अर्जासह उपस्थित राहवे. दिलेल्या वेळे नंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्विकारला जाणार नाही. उमेदवाराने मुलाखतीस येण्यापुर्वी सदरील जाहिरातीत दिलेल्या अटी व शर्तीचे संपुर्ण वाचन करुनच मुलाखतीस उपस्थित राहवे.

३. मनोविकार तज्ञ या पदाबाबत उपरोक्त दिनांकास अर्ज प्राप्त नाही झाल्यास किंवा निवड झालेल्या उमेदवाराने राजीनामा दिल्यास प्रत्येक महिण्याच्या दुसऱ्या मंगळवारी (सुटी असल्यास दुसऱ्या दिवशी) उपरोक्त वेळेवर अर्ज स्वीकारण्यात येईल व Walk-in Interview घेण्यात येणार आहेत.

४. मुलाखतीस उपस्थित राहण्यासाठी उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता किंवा भाडे देण्यात येणार नाही.

५. मुलाखत प्रक्रियेत उपस्थित उमेदवारांच्या अर्जांची शैक्षणिक योग्यता व अनुभव या प्रमाणात छाणणी करण्यात येईल. अपात्र उमेदवाराचे अर्ज बाद करण्यात येतील.

६. छाणणीतुन पात्र ठरलेल्या उमेदवारांची कार्यालया मार्फत मुलाखती घेण्यात येतील व मुलाखतीत पात्र उमेदवाराची ३१ मार्च २०१८ पर्यंत करारतत्वावर निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास करारतत्वाच्या अटी शर्ती मान्य असल्या बाबत रु.१००/- च्या स्टॅप पेपर वर करारनामा लिहुन दयावा लागेल.

७. सदरील पदाची भरती प्रक्रिया **अध्यक्ष, तथा जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय,** परभणी यांचे मार्फत करण्यात येईल.

८. सदर भरती प्रक्रियेच्या नियम, अटी व शर्ती, पद संख्येत बदल करण्याचे अधिकार, उमेदवारांची गुणानुक्रमानुसार शॉर्ट लिस्टिंग करण्याचे अधिकार हे **अध्यक्ष, तथा जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय,** परभणी यांनी आपल्याकडे राखुन ठेवलेले आहे.

९. भरती प्रक्रियेच्या वेळी निवड समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या दबाव आणणाऱ्या उमेदवारास त्याच क्षणी भरती प्रक्रियेतुन वगळण्यात येईल.

अध्यक्ष
तथा जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, परभणी